**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. १८५–०८, १९३–०८ दिनांक :

**ग्राहक तक्रार क्र. १८५/२००८**

१) सौं. गीता गणेश कानिटकर,
विजयनगर, कुपवाड, जि.सांगली अर्जदार

**ग्राहक तक्रार क्र. १९३/२००८**

२) मे. नितीन टेक्स्टाईल्स,
शनिवार पेठ, माधवनगर, जि.सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली.
२) कार्यकारी अभियंता (शहर),महावितरण, विरूध्द पक्षकार
शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्सजवळ, सांगली.
३) उपकार्यकारी अभियंता,महावितरण,उ. वि. माधवनगर,सांगली.
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य
श्री. जावेद मोमीन, अर्जदार प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)

## संयुक्त निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिनांक ०२.१२.२००८

प्रस्तुत दोन्ही तक्रार प्रकरणामध्ये अर्जदार जरी वेगळे असले तरी वि.प. हे दोन्ही प्रकरणामध्ये एकच आहेत. तसेच या दोन्ही प्रकरणामध्ये यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणे संबंधात विषय आहे. तसेच या दोन्ही तक्रार अर्जदारांचे प्रतिनिधी हे श्री. जावेद मोमीन, इचलकरंजी हेच आहेत. सबब न्यायाच्या दृष्टीने ही दोन्हीही प्रकरणें एकत्रित एकाच न्यायनिर्णयामध्ये निकाली काढणे या मंचास योग्य वाटत आहे. तसेच या एकत्रित न्यायनिर्णयामुळे कोणत्याही पक्षकाराचे हक्कास बाधा येवू शकत नाही. म्हणून दोन्ही प्रकरणांमध्ये एकत्रितरित्या न्याय निर्णय देण्यात येत आहे.

सदरील दोन्ही तक्रार अर्जदार यांनी ' क्ष ' नमुन्यामध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणे बाबत अर्ज केले होते. परंतु त्याचा निकाल लागणे अगोदरच, त्यांचा विद्युत पुरवठा वितरण कंपनीकडून खंडीत होवू शकेल या भितीने अशा दोन्हीही यंत्रमागधारक तक्रार अर्जदारांनी दि. ३.७.२००८ रोजी या मंचाकडे ' अ ' नमुन्यामध्ये अर्ज दाखल केले आहेत. या दोन्हीही अर्जामध्ये मुख्यत: जी तक्रार केली आहे ती अशी की, यंत्रमाग संजीवनी योजना महाराष्ट्र सरकारने लागू केली असतांनाही व त्याप्रमाणे दि. ३१.३.२००४ अखेर ग्राहकाकडे असलेल्या थकबाकीपैंकी ५०% रकमेस सूट देण्याची योजना लागू असतांनाही वितरण कंपनीने सदर योजनेचा लाभ अर्जदारांना दिला नाही व त्यांचे नांवे पोकळ थकबाकी दर्शविलेली आहे. असे असतांनाही व अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल असतांनाही वितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत १५ दिवसांची नोटीस दिलेली आहे. सबब सदरचा अर्ज या मंचाकडे न्याय मिळणेसाठी दाखल केलेला आहे. या पंधरा प्रकरणामध्ये प्रकरणांचा निकाल होईपर्यंत वितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडीत करु नये म्हणून अंतरीम आदेश मिळणे बाबत अर्ज दिला. त्याप्रमाणे या मंचाचे त्यावेळचे सदस्यद्वय यांनी ता. १५.७.२००८ रोजी अंतरीम आदेश दिला. तसेच पुढे दि. ११.८.२००८ रोजी देखील अंतरीम आदेश देवून विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत प्रतिबंद केला.

पुढे वि.प.स अर्जदारांचे तक्रारीबाबत मांडणेसाठी संधी दिली. त्याप्रमाणे वितरण कंपनीतर्फे लेखी म्हणणे तसेच ग्राहकांचे सीपीएलचे उतारे दाखल केले. अर्जदारांनी देखील या मंचाच्या आदेशा प्रमाणे सन २००४ पासून पुढे भरणा केलेल्या रकमेबाबत तपशिल दिला.

तद्नंतर अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन यांचा युक्तीवाद व म्हणणे सविस्तरपणे सांगली कॅम्प तसेच कोल्हापूर कॅम्प येथे मंचाने ऐकले. या उलट, वितरण कंपनीतर्फे श्री. पी.जी. जेधे, कार्यकारी अभियंता, श्री. पाडळकर, उप कार्यकारी अभियंता, विभागीय लेखापाल यांनी त्यांची बाजू मांडली. वितरण कंपनीतर्फे ग्राहकांचे सीपीएल सन २००० ते २००७ पर्यंत देण्यात आलेले आहे. तसेच सीपीएलमध्ये विद्युत वापरा बाबत लावलेल्या बिलासंबंधात महाराष्ट्र सरकारने दिलेल्या सवलतीचे दरांचा उल्लेख नसलेने त्या बाबत सवलतींच्या दराने होणारा वीज आकार तसेच ग्राहकाने भरलेली रक्कम या बाबत ऑडीटेड स्टेटमेंटस् सन २००० ते २००५ पर्यंत दाखल केलेली आहेत.

दोन्ही बाजूचे पक्षकारांनी यंत्रमाग संजीवनी योजनेबाबत महाराष्ट्र शासनाकडील तसेच वि.प.कडून प्रसिध्द केलेल्या विभागीय परिपत्रकांचा उल्लेख केलेला आहे.



वरील सर्व बाबींचा विचार करता व दोन्ही बाजूंचे म्हणणे विचारात घेवून यंत्रमाग संजीवनी योजने संबंधातील दि. २१.७.२००४ चे परिपत्रक तसेच तद्नंतर थकबाकी भरणेसाठी मुदतवाढी बाबतची परिपत्रके ज्यामध्ये अखेरचे मार्च २००५ पर्यंत थकबाकी व चालू बील भरणे बाबत उल्लेख आहे अशी सर्व परिपत्रके या मंचाने अवलोकन केलेली आहेत. या सर्वांचा विचार करता व तक्रार अर्जदारांची मागणी विचारात घेता, खालील मुद्दे या दोन्ही प्रकरणामध्ये आमच्या निष्कर्षास उद्‌भवतात.

१) तारीख ३१.३.२००४ पर्यंत सदरील दोन्ही तक्रार अर्जदारांची वीज बिलापोटी किती रकमेची थकबाकी होती ?

उत्तर :– अ) तक्रार क्र. १८५/०८ मध्ये मार्च २००४ अखेर रु. ३,८४,७६८/– व

ब) तक्रार क्र. १९३/०८ मध्ये मार्च २००४ अखेर रु. ५८,४४५/– एवढी थकबाकी होती.

२) सदरील दोन्ही अर्जदारांनी शासनाने प्रसिध्द केलेल्या यंत्रमाग संजीवनी योजनेच्या परिपत्रकाप्रमाणे ३१ मार्च २००५ अखेर वीज बील थकबाकी व त्या तारखेपर्यंतचे चालू बिलाची रक्कम भरली होती काय ?

उत्तर :– दोन्ही अर्जदारांना दिलेल्या त्यावेळच्या बिलाप्रमाणे मार्च २००५ अखेर त्यांचे नांवे वि.प.कडे आगाऊ रकमा असल्या बाबत बिले देण्यात आली होती.

अ) तक्रार अर्ज क्र. १८५/०८ मधील ग्राहकाचे सीपीएल प्रमाणे मार्च २००५ अखेर रु. २१,५१७.०८ एवढी रक्कम आगाऊ जमा होती.

ब) तक्रार अर्ज क्र. १९३/०८ मधील ग्राहकाचे सीपीएल प्रमाणे मार्च २००५ अखेर रु. २४,३२३/– एवढी रक्कम आगाऊ जमा होती.

३) दोन्ही अर्जदारांना वि.प.तर्फे संजीवनी योजनेचा लाभ मार्च २००५ अखेर देण्यात आला होता काय ?

उत्तर :– नाही

४) वरील दोन्ही अर्जदारांना वि.प.चे विभागीय परिपत्रक (वाणिज्य) क्र. ७१२ दि. २१.७.२००४ व क्र. ७२८ दि. ११.१.२००५ नुसार जाहीर केलेल्या यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर :–होय

५) आदेश ?

उत्तर :– अखेरच्या आदेशाप्रमाणे

**<u>कारणमिमांसा</u>**

संबंधित दोन्ही अर्जामध्ये वि.प.तर्फे सन २००० पासून पुढे जून २००७ पर्यंत अर्जदारांचे वीज बिला संबंधातील खाते उतारे दाखल केलेले आहेत. वि.प.च्या म्हणण्याप्रमाणे सदरील खाते

उताऱ्यामध्ये ज्या रकमा ग्राहकांचे नांवे वेळोवेळी दाखविलेल्या आहेत त्या विद्युत नियामक आयोगाच्या बील दराप्रमाणे दाखविण्यात आलेल्या आहेत.



वि.प.चे म्हणणे असे आहे की, सीपीएलमध्ये महाराष्ट्र शासनाने सन २००० पासून यंत्रमागधारकांना वेळोवेळी वीज आकारामध्ये जी सवलत दिली होती त्याप्रमाणे आकारणी व येणे रकमा वरील खाते उताऱ्यामध्ये दाखविण्यात आलेली नाही. या खाते उताऱ्याप्रमाणे मार्च २००४ अखेर अर्ज क्र. १८५ व १९३ मधील ग्राहकांकडे अनुक्रमे रु. ३,८४,७६८.७९ व रु. ५८,४४५.२९ एवढ्या रकमा थकबाकीच्या होत्या. मात्र पुढे मार्च २००५ अखेर त्याच सीपीएलमध्ये या दोन्ही ग्राहकांच्या वरील रकमांची परिपूर्ती होवून उलट वि.प.कडे आगाऊ रकमा असल्याचे दाखविले आहे. परिणामी, दोन्ही ग्राहकांनी मार्च २००५ अखेर त्यांच्याकडे असणारी थकबाकी व चालू बिले देवूनही उलट त्यांच्याच रकमा आगाऊ वि.प.कडे जमा असल्याचे दिसते. सबब शासनाने जाहीर केलेल्या यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ या दोन्ही अर्जदार ग्राहकांना मिळणे आवश्यक होते.

परंतु या दोन्ही प्रकरणामध्ये वि.प.तर्फे व अर्जदारातर्फे दिलेल्या कागदपत्रांवरुन व म्हणण्याप्रमाणे असे दिसून येते की, एप्रिल २००४ ते २५.११.२००४ या काळामध्ये अर्ज क्र. १८५/०८मध्ये केवळ रु. ११,६००/- व अर्ज क्र. १९३/०८ मध्ये दि. १.३.२००४ ते २८.५.२००८ या काळामध्ये रु. १६२०/- व तदनंतर दि. ९.८.२००४ रोजी रु. १०९०/- एवढ्याच रकमा भरलेल्या होत्या. पुढे वि.प.ने असेही म्हणणे आहे की, सीपीएल प्रमाणे दाखविलेल्या नांवे रकमा व मार्च २००५ अखेर दिसून येणारी आगाऊ जमा रकमा ह्या संगणक विभागातील तांत्रिक दोषामुळे दिसून येतात. तसेच वीज आकारणी ही महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या दराने केलेली नाही. सबब सीपीएल मधील कोणतेही आकडे योग्य व बरोबर नाहीत. या बाबत ग्राहकांना वेळोवेळी दिलेली बिले जरी आगाऊ रकमा जमा असल्याची दिली होती ती देखील त्यामध्ये दुरुस्त्या करुन ग्राहकास दिलेली होती. एकूण वि.प.तर्फे म्हणणे आहे की, ग्राहकाने सन २००० पासून पुढे मार्च २००५ पर्यंत जो विजेचा वापर केला त्याबाबत शासनाच्या सवलतीच्या दराने होणारा वीज आकार तसेच ग्राहकाने वेळोवेळी भरलेली रक्कम या बाबत ऑडीटेड स्टेटमेंट तयार करण्यात आलेले आहे व ते या दोन्ही प्रकरणामध्ये वि.प.तर्फे दाखल करण्यात आलेले आहे. त्या ऑडीटेड स्टेटमेंट प्रमाणे अर्ज क्र. १८५/०८ मध्ये खालील प्रमाणे मार्च २००४ अखेर व मार्च २००५ अखेर रकमा दाखविलेल्या आहेत.

मार्च २००४ अखेर रु. ३९०३.८६ येणे रक्कम

मार्च २००५ अखेर रु. ८२३५.१६ येणे रक्कम

अशी येणे रक्कम अर्जदाराने भरलेली नसलेने त्यास यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. अर्ज क्र. १९३/०८ मधील ऑडीटेड स्टेटमेंट प्रमाणे

मार्च २००४ अखेर रु. २४७११.९३ येणे रक्कम

मार्च २००५ अखेर रु. ३१८३५.९३ येणे रक्कम

अशा रकमा येणे दाखविल्या आहेत. वरील येणे रकमेपैकी पूर्ण रकमा दोन्ही तक्रार अर्जदारांनी भरल्या नसल्याने त्यांना यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिलेला नाही.

वरील प्रमाणे अर्जदारांना दिलेली बिले व सीपीएल तक्ता याचा विचार करता तसेच वि.प.तर्फे या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या ऑडीटेड स्टेटमेंटचा विचार करता, असे दिसून येते की, मार्च

२००५ अखेर ज्या रकमा ऑडीटेड स्टेटमेंटमध्ये येणे दाखविण्यात आल्या आहेत त्या रकमा सीपीएलमध्ये अथवा ग्राहकाना दिलेल्या मार्च २००५ अखेरच्या बिलामध्ये येणे दाखविलेल्या नव्हत्या.



उलटपक्षी, त्यांच्याच आगाऊ रकमा वि.प.कडे जमा असल्याच्या त्यांच्या बिलामध्ये दाखविलेल्या आहेत. सबब केवळ चुकीच्या बिलामुळे अथवा सीपीएल प्रमाणे त्यांच्या नांवे आगाऊ रकमा जमा दाखविल्या असलेने व पुढे ऑडीटेड स्टेटमेंट प्रमाणे मार्च २००५ अखेर त्यांच्याकडून येणे रकमा दिसून येत असलेने व त्यामुळे या दोन्ही तक्रार अर्जदारांना यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिला गेला नाही यामध्ये या ग्राहकांचा कोणताही दोष दिसून येत नाही. जर संबंधितवेळी त्यांना त्यांचे बिलामध्ये या येणे रकमांचा अथवा अन्य रकमांचा उल्लेख केला असता तर त्यावेळी सदरील दोन्ही ग्राहक शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या मुदतीमध्ये त्यांच्या रकमांची परिपूर्तता करु शकले असते व त्यांना यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळू शकला असता.

या दोन्ही प्रकरणामध्ये सीपीएल प्रमाणे ज्या रकमा ग्राहकाने जमा केलेल्या आहेत त्याबाबत वि.प. अथवा ग्राहक यांच्यात वाद नाही. मात्र सीपीएल प्रमाणे येणे रकमा अर्जदारांनी आगाऊ जमा केल्याचे दाखविले आहे त्या चुकीच्या आहेत असे वि.प.चे म्हणणे असल्याने वि.प.तर्फे सवलतीच्या दराने वीज आकारणी करण्यात आलेली आहे. दोन्ही प्रकरणामध्ये सन २०००पासून मार्च २००४ पर्यंत ऑडीटेड स्टेटमेंटस दाखल करण्यात आलेली आहेत. सबब या दोन्ही ऑडीटेड स्टेटमेंटसच्या आधारे मार्च २००४ अखेर या दोन्ही अर्जदारांच्या नांवे ज्या येणे रकमा आहेत त्यामध्ये त्यांना यंत्रमाग संजीवनी योजनेनुसार ५०% सूट मिळणे आवश्यक ठरते. कायद्याच्या तत्वानुसार अशी सूट दिली गेली आहे असे गृहीत धरुन पुढे उरलेली ५०% रक्कम व त्यापुढे होणारे चालू बिलाची रक्कम अशी देय रक्कम मार्च २००५ अखेर ग्राहकाचे नांवे दाखविणे आवश्यक आहे व तदनंतर पुढे ग्राहकाला मागणी नोटीस देईपर्यंतची रक्कम नियमाप्रमाणे असेल त्या रकमेची त्याच्याकडून वसुली करणे आवश्यक आहे.

या दोन्ही प्रकरणामध्ये दोन्ही अर्जदारांना वि.प.तर्फे सन २००८ मध्ये त्यांच्याकडून येणे असलेल्या रकमा भरण्याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या होत्या. त्या रकमा यंत्रमाग संजीवनी योजनेचा विचार करता व त्याच्या लाभाचा विचार करता योग्य आहेत किंवा कसे हे पहाणे आवश्यक ठरते. या दोन्ही ग्राहकांना ऑडीटेड स्टेटमेंट प्रमाणे संजीवनी योजनेचा लाभ न देता येणे रकमा त्यांचे नांवे दिलेल्या आहेत. सबब या योजने प्रमाणे मार्च २००४ अखेरच्या रकमेवर ५०% सूट देणे व पुढील येणे रक्कम तपशिलवार काढणे आवश्यक ठरते व जी रक्कम नोटीस तारखेपर्यंत काढली जाईल त्या रकमेची वसुली व तदनंतरच्या वीज बिलाची वसुली वि.प.करु शकतो. सबब या दोन्ही अर्जामधील वरील मुद्द्यांबाबत आम्ही आमचे निष्कर्ष नोंदवित आहोत.

वरील दोन्ही अर्जदारांना यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मंजूर करणे आवश्यक ठरते. यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देवून मार्च २००४ अखेर दोन्ही प्रकरणामध्ये खालील रकमा येणे निघू शकतात.

<u>तक्रार अर्ज क्र. १८५/०८ मध्ये</u>

| | | |
|---|---|---|
| मार्च २००४ अखेर येणे रक्कम | .. | रु. ३९०३.८६ |
| महाराष्ट्र शासन संजीवनी योजनेची सवलत ५०% | .. (–) | रु. १९५१.९३ |
| मार्च २००४ अखेर उरलेली रक्कम | .. | रु. १९५१.९३ |
| एप्रिल २००४ ते फेब्रुवारी २००५ वीज वापर रक्कम | .. | रु. १५९३१.३० |
| मार्च २००५ अखेर एकूण येणे | .. | रु. १७८८३.२३ |

| | | |
|---|---|---|
| मार्च २००४ ते मार्च २००५ अखेर ग्राहकाने भरलेली रक्कम | .. | रु. ११६००.०० |
| मार्च २००५ अखेर ग्राहकाकडून येणे रक्कम | .. | रु. ६२८३.२३ |



वरील प्रमाणे या ग्राहकाकडे मार्च २००५ अखेर येणे रक्कम निघत आहे. वि.प.ने मार्च २००५ ते नोटीस तारखेपर्यंतचे काळामध्ये ग्राहकाने वापरलेल्या वीज बिलाबाबत नियमाप्रमाणे आकारणी करुन पुढील येणारे एकूण रकमेचे ग्राहकास बील देणे आवश्यक आहे व अशी रक्कम त्यांचेकडून वसुलीपात्र आहे.

तक्रार अर्ज क्र. १९३/०८ मध्ये

| | | |
|---|---|---|
| मार्च २००४ अखेर येणे रक्कम | .. | रु. २४७११.९३ |
| महाराष्ट्र शासन संजीवनी योजनेची सवलत ५०% | .. (–) | रु. १२३५५.९६ |
| मार्च २००४ अखेर उरलेली रक्कम | .. | रु. १२३५५.९६ |
| एप्रिल २००४ ते फेब्रुवारी २००५ वीज वापर रक्कम | .. | रु. ९८३४.०० |
| मार्च २००५ अखेर एकूण येणे | .. | रु. २२१९३.९६ |
| मार्च २००४ ते मार्च २००५ अखेर ग्राहकाने भरलेली रक्कम | .. | रु. २७१०.०० |
| मार्च २००५ अखेर ग्राहकाकडून येणे रक्कम | .. | रु. १९४८३.९६ |

वरील प्रमाणे या ग्राहकाकडे मार्च २००५ अखेर येणे रक्कम निघत आहे. वि.प.ने एप्रिल २००५ ते नोटीस तारखेपर्यंतचे काळामध्ये ग्राहकाने वापरलेल्या वीज बिलाबाबत नियमाप्रमाणे आकारणी करुन पुढील येणारे एकूण रकमेचे ग्राहकास बील देणे आवश्यक आहे व अशी रक्कम त्यांचेकडून वसुलीपात्र आहे.

वरील दोन्ही अर्जामध्ये मार्च २००५ मध्ये ग्राहकाकडे येणे दशविलेल्या रकमेमध्ये वि.प.ने एप्रिल २००५ नंतर ते नोटीस तारखेपर्यंत ग्राहकाने वापरलेल्या बिाची आकारणी करुन त्यास एकूण रकमेचे बील देणे क्रमप्राप्त आहे व अशी येणारी रक्कम ग्राहकाने वि.प.स भरणे क्रमप्राप्त आहे. सबब या दोन्ही प्रकरणामध्ये काढलेल्या मुद्द्यांवर आम्ही आमचे निष्कर्ष नोंदविले आहेत. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

**अ) अर्ज क्र. १८५/०८**

१) यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देणेबाबत मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने दाखल केलेल्या ऑडीटेड स्टेटमेंटप्रमाणे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देवून तक्रार क्रमांक १८५/०८ मधील ग्राहकाकडे मार्च २००५ अखेर रु. ६२८३.२३ एवढी रक्कम येणे आहे.

३) तसेच सदरील ग्राहकाकडे मार्च २००५ नंतर पुढे वि.प.ने दिलेल्या नोटीस तारखेपर्यंत वापरलेल्या विजेचा होणारा आकार ( व्याज व विलंब आकाराविरहित) वि.प.कडे त्या ग्राहकाने बील मुदतीमध्ये केलेला भरणा रकमेची वजावाट करुन आकारणी करावी व ग्राहकास दि. ३१.५.२००८ पर्यंत व वरील प्रमाणे मार्च २००५ अखेरचे येणेसह होणाऱ्या एकूण रकमेचे बील देण्यात यावे. ग्राहकाने अशा बिलाची रक्कम बील दिलेल्या तारखेपासून १५ दिवसांपर्यंत भरावी. या मुदतीमध्ये ग्राहकाने

दिनांक ३१.५.२००८ पर्यंत बिलाप्रमाणे होणारी व मागणी केलेली रक्कम जर भरली नाही तर वि.प.ला नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे रक्कम वसुलीचा अधिकारी राहील.



४) वरील प्रमाणे दिलेल्या निर्णयानुसार हे दोन्ही अर्ज निकाली निघत असलेने दि. १५.७.२००८ व दि. ११.८.२००८ रोजी या मंचाकडून देण्यात आलेले आंतरीम स्थगन आदेश संपुष्टात आले आहेत.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

**ब) <u>अर्ज क्र. १९३/०८</u>**

१) यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देणेबाबत मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने दाखल केलेल्या ऑडीटेड स्टेटमेंटप्रमाणे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देवून तक्रार क्रमांक १८५/०८ मधील ग्राहकाकडे मार्च २००५ अखेर रु. १९४८३.९६ एवढी रक्कम येणे आहे.

३) तसेच सदरील ग्राहकाकडे मार्च २००५ नंतर पुढे वि.प.ने दिलेल्या नोटीस तारखेपर्यंत वापरलेल्या विजेचा होणारा आकार ( व्याज व विलंब आकाराविरहित) वि.प.कडे त्या ग्राहकाने बील मुदतीमध्ये केलेला भरणा रकमेची वजावाट करुन आकारणी करावी व ग्राहकास दि. ३१.५.२००८ पर्यंत व वरील प्रमाणे मार्च २००५ अखेरचे येणेसह होणाऱ्या एकूण रकमेचे बील देण्यात यावे. ग्राहकाने अशा बिलाची रक्कम बील दिलेल्या तारखेपासून १५ दिवसांपर्यंत भरावी. या मुदतीमध्ये ग्राहकाने दि. ३१.५.२००८ पर्यंत बिलाप्रमाणे होणारी व मागणी केलेली रक्कम जर भरली नाही तर वि.प.ला नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे रक्कम वसुलीचा अधिकारी राहील.

४) वरील प्रमाणे दिलेल्या निर्णयानुसार हे दोन्ही अर्ज निकाली निघत असलेने दि. १५.७.२००८ व दि. ११.८.२००८ रोजी या मंचाकडून देण्यात आलेले आंतरीम स्थगन आदेश संपुष्टात आले आहेत.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०२.१२.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..